T. 16/10/24

वाचले :

१. श्री.रजनीकांत हरिश्चंद्र पगारे , पदनाम- लिपिक, विभाग वैदयकिय मुख्य कार्यालय यांचे घरबांधणी अग्रिम मिळण्याबाबत दिनांक २९/११/२०२३ चा विनंती अर्ज.
२. श्री.रजनीकांत हरिश्चंद्र पगारे ,लिपिक व मे.एस.आर.शाह अतुल एंटरप्रायजेस यांच्यामधील दि. २५/०१/२०२४ चा करारनामा.
३. आरोग्य वैदयकिय अधिकारी, वैदयकिय मुख्य कार्यालय यांचेकडील पत्र क्र. वैदय/१०/कावि/१६३/२०२३ दिनांक ०४/१२/२०२३ अन्वये केलेली शिफारस
४. प्रशासन अधिकारी, वैदयकिय मुख्य कार्यालय यांचेकडील पत्र क्र. वैदय/१०/कावि/३८२/२०२४ दिनांक ०६/०२/२०२४ पत्र.
५. सह दुय्यम निबंधक वर्ग २, हवेली क्र.५, पिंपरी चिंचवड यांचेकडील दस्त क्रमांक १८४४/२०२४ दि.२५/१/२०२४ अन्वये सादर केलेले चुक दुरस्ती पत्र.
६. मा.उपसंचालक,नगररचना यांचा क्रमांक नरवी/कावि/३४/२४/२०२३, दिनांक.- ११/०६/२०२४ अन्वये अहवाल
७. पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांचेकडील भोगवटा पत्र क्र. २०२/२०२३ दि.२९/३/२०२३
८. एक्सीस बँक यांचेकडील दि-२०/०६/२०२४ रोजीचे कर्ज स्टेटमेन्ट.
९. मा.आयुक्त यांचेकडील आदेश क्रमांक प्रशा/२/कावि/७४/२०२१, दि.२८/०१/२०२१ अन्वये विभागप्रमुख घोषित करण्यात आले असून प्रशासकीय स्वरुपाचे अधिकार प्रदान करण्यात आलेले असून घरबांधणी अग्रिम मंजूर करण्याचे अधिकार विभागप्रमुख,प्रशासन यांना प्रदान करण्यात आले आहेत.
१०. सामान्य प्रशासन विभागाकडील आदेश क्र .प्रशा/१८/कावि/५६/२०२२, दिनांक-२०/०१/२०२२
११. मा. महापालिका सभा ठराव क्रमांक ६३३, दिनांक ३०/०४/२०२१
१२. सामान्य प्रशासन विभागाचे परिपत्रक क्रमांक प्रशासन/१५/कावि/१८६/२०२१, दि. ११/०६/२०२१.
१३. सामान्य प्रशासन विभागाचा दिनांक :-०१/०७/२०२४ चा मंजूर प्रस्ताव.

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
सामान्य प्रशासन विभाग
क्रमांक साप्रवि/१६/कावि/१३९/२०२४
दिनांक :-०१/०७/२०२४

विषय :- घरबांधणी अग्रिम मंजुरीबाबत.
श्री.रजनीकांत हरिश्चंद्र पगारे पदनाम लिपिक
विभाग- वैदयकिय मुख्य कार्यालय कर्मचारी संगणक क्र. १०५७६

आदेश,

श्री.रजनीकांत हरिश्चंद्र पगारे हे पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवर लिपिक या पदावर अग्निशामक विभागात कामकाज करीत आहेत. त्यांनी दि. २९/११/२०२३ च्या अर्जान्वय ॲक्सीस बँकेचे घरबांधणी कर्ज फेडण्यासाठी घरबांधणी अग्रिम र.रु २४,०३,१९३/-मिळण्यासाठी विनंती केली आहे. घरबांधणी अग्रिम मंजुरीस प्रशासन अधिकारी, वैदयकिय मुख्य कार्यालय यांनी पत्र क्र. वैदय/१०/कावि/३८२/२०२४ दिनांक ०६/०२/२०२४ अन्वये शिफारस केली आहे. तसेच खातेनिहाय चौकशी चालू नसल्याबाबत अथवा प्रस्तावित केले नसल्याबाबत अहवाल दिला आहे.

श्री.रजनीकांत हरिश्चंद्र पगारे यांची महापालिका आस्थापनेवर एकूण ११ वर्षे ६ महिने सेवा पूर्ण झाली असून, शिल्लक सेवा १६ वर्षे १ महिने एवढी आहे.

श्री.रजनीकांत हरिश्चंद्र पगारे हे मौजे डूडूळगाव येथील पिंपरी चिंचवड मनपा कार्यक्षेत्रातील ग.नं.१८८ येथील मे.एस.आर.शाह अतुल एंटरप्रायजेस यांचेकडील "देवराई" या नावाने

ओळखल्या जाणा-या **चौथ्या** मजल्यावरील फ्लॅट क्र ४१२ बांधकाम क्षेत्र ४७.२१ चौ.मीटर + **लगतचे बाल्कीनी क्षेत्र ५.८० चौ.मीटरचा फलॅट** खरेदी केला आहे. मे.एस.आर.शाह अतुल एंटरप्रायजेस व **श्री.रजनीकांत हरिश्चंद्र पगारे** दि. २५/१/२०२४ रोजी करारनामा झाला आहे. तसेच श्री.पगारे यांनी सह दुय्यम निबंधक वर्ग २, हवेली क्र.५, पिंपरी चिंचवड यांचेकडील दस्त क्रमांक १८४४/२०२४ दि.२५/१/२०२४ अन्वये सादर केलेले चुक दुरस्ती पत्र सादर केले आहे. करारनाम्यानुसार प्रस्तुत फलॅटची एकूण किंमत र.रु.२६,३९,७००/-इतकी ठरली असून,सदर करारनामा मे.दुय्यम निबंधक वर्ग-२ हवेली क्र.५ पिंपरी चिंचवड यांचे कार्यालयात दस्तऐवज अ.क्र. हवल,दिनांक १७/११/२०२१ अन्वये नोंदविण्यात आला आहे. सदर फ्लँट खरेदी करण्यासाठी **श्री.रजनीकांत हरिश्चंद्र पगारे** यांनी एक्सीस या बँकेकडून घरबांधणी अग्रीम घेतलेले असुन दिनांक २०/०६/२०२४ अखेर र.रु २३,८१,५४५/- इतके कर्ज परतफेड बाकी आहे. सदर कर्जाची परतफेड करणेकामी **श्री.रजनीकांत हरिश्चंद्र पगारे** यांनी सदर फ्लॅट क्र. ४१२ वर मनपा नियमानुसार घरकर्ज मंजुर करुन मिळणेबाबत विनंती केलेली आहे. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांचेकडील भोगवटा पत्रक क्र.२०२/२३ ची प्रत देखील सादर केली आहे.

मौजे डूडूळगाव येथील पिंपरी चिंचवड मनपा कार्यक्षेत्रातील ग.नं.१२२ येथील **मे.एस.आर.शाह अतुल एंटरप्रायजेस** यांचेकडील **"देवराई"** या नावाने ओळखल्या जाणा-या एकूण बांधकाम क्षेत्र **४७.२१ चौ.मीटरचे** मोजमापाचा **मे.एस.आर.शाह अतुल एंटरप्रायजेस** तर्फे श्री संदिप रसिकलाल शाह व इतर यांचे नावे असून त्यांचेकडुन श्री.रजनीकांत हरिश्चंद्र पगारे यांनी खरेदी केली असल्याचे इंडेक्स टू नोंदीवरुन दिसून येते.अपर तहसिलदार पिंपरी चिंचवड ता.हवेली. जि. पुणे यांचेकडील आदेश क्र.जमीन/एनए/एसआर/ ०१/२०२०,दिनांक-१३/०१/२०२० अन्वये सदर मिळकतीस अकृषिक वापरासाठी परवानगी दिली आहे. वकील श्री.पारस गौतम कांकरीया यांचेकडील दि.२२ /०३/२०२२ चे सर्च कम टायटल रिपोर्ट अन्वये सदर मिळकत निर्वेध व निजोखमी आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांचेकडील क्र.बीपी/डुडुळगाव/४५/२०२१, दि.०५/१०/२०२१ अन्वये बांधकामास परवानगी दिली असून, प्रकरणी मंजूर नकाशाप्रत व आवश्यक कागदपत्र सादर केली आहेत.

बॉम्बे फायनान्सीयल रुल्स १९५९ अपेंडीक्स २६ मधील नियम २ (ड) नुसार तयार घर खरेदी करण्यासाठी घरबांधणी अग्रिम देण्याची तरतूद आहे. शासन निर्णय क्रमांक घबांअ-२०१९/प्र.क्र.१४/२०१९/विनियम मंत्रालय, मुंबई-४०००३२, दि. ०२ फेब्रुवारी २०२१,अन्वये घरबांधणी अग्रिम मर्यादा वाढविणेत आली आहे. त्यास अनुसरुन मा. महापालिका सभा ठराव क्रमांक ६३३, दिनांक ३०/०४/२०२१ अन्वये महानगरपालिका आस्थापनेवरील नियमित वेतनश्रेणीत सलग २ वर्षे सेवा पूर्ण झालेल्या महापालिकेतील अधिकारी/कर्मचारी यांना पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रातील हद्दीपासून २० कि. मी. अंतरापर्यंत फ्लॅट/घर खरेदी करणेसाठी मूळ वेतनाच्या १०० पट मिळून येणारी रक्कम परंतु कमाल मर्यादा रक्कम रुपये ७०,००,०००/ विहित मर्यादेपर्यंत घरबांधणी अग्रिम मंजूर करण्यास मान्यता दिली आहे. तसे परिपत्रक क्र. प्रशासन/१५/कावि/१८६/२०२१, दि. ११/०६/२०२१ अन्वये सर्व कर्मचा-यांच्या निदर्शनास आणून देणेबाबत संबंधित विभाग प्रमुखांना कळविले आहे. तसेच स्थायी समिती ठराव क्रमांक ५५७, दिनांक २९/०१/१९८५ अन्वये घरबांधणी अग्रिम मंजूर करण्याचे अधिकार मा. आयुक्त यांना प्रदान केले आहेत. तसेच तद्नंतर मा.आयुक्त यांचेकडील आदेश क्रमांक प्रशा/२/कावि/७४/२०२१, दि. २८/०१/२०२१ अन्वये विभागप्रमुख घोषित करण्यात आले असून प्रशासकीय स्वरुपाचे अधिकार प्रदान करण्यात आलेले असून घरबांधणी अग्रिम मंजूर करण्याचे अधिकार विभागप्रमुख,प्रशासन यांना प्रदान करण्यात आले आहेत. प्रशासन विभागाकडील आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५६/२०२२, दिनांक-२०/०१/२०२२ अन्वये घरबांधणी अग्रिम मंजूर करण्याचे अधिकार सहाय्यक आयुक्त ,प्रशासन यांना प्रदान करण्यात आले आहेत.

श्री.रजनीकांत हरिश्चंद्र पगारे यांचा माहे **ऑक्टोबर-२०२३** च्या वेतनाच्या दाखल्यानुसार मूळवेतन र.रु. **३१,१००/-** इतके आहे. त्यांचा एकूण पगार र.रु **५६,५०३/- (पेट्रोल भत्ता र.रु.०/- वजा जाता)** इतका आहे. **श्री.रजनीकांत हरिश्चंद्र पगारे** यांचे मुळ वेतन वेतनाच्या १०० पट प्रमाणे परतफेडीची क्षमता व पेमेंट ऑ"क"वेजेसॲक्ट१९३६ मधील कलम७(३)(२) नुसार खालीलप्रमाणे एकूण रकमा येतील.

**श्री.रजनीकांत हरिश्चंद्र पगारे हे मनपा आस्थापनेवर दि.१४/१२/२०१२ रोजी रुजु झाले असुन ते सदयस्थिती वर्ग ३ मधील लिपिक या पदावर कार्यरत आहेत त्यांची सेवानिवृत्तीची दिनांक ३१/०७/२०४० अशी आहे. आज अखेर त्यांची शिल्लक सेवा (१६ वर्ष ०१ महिने) (म्हणजेच १९३ महीने) इतकी आहे. त्यांचे शिल्लक सेवेचे महिने विचारात घेता सेवानिवृत्तीपुर्वी किमान ६ महिने अगोदर घर बांधणी अग्रीम व त्यावरील व्याज रकमेची संपुर्ण वसुली होणे**

**आवश्यक असल्याने त्यांना मुळ मुददल वसुली कामी १६३ महिने व व्याज रकमेसाठी २४ महिने असे एकुण १८७ महिने आवश्यक आहेत.** माहे **ऑक्टोबर-२०२३** च्या वेतनाच्या दाखल्यानुसार मूळवेतन र.रु. **३१,१००/-** इतके आहे. त्यांचा एकूण पगार र.रु **५६,५०३/- (पेट्रोल भत्ता र.रु.०० व इतर भत्ते वजा जाता)** इतका आहे. **श्री.रजनीकांत हरिश्चंद्र पगारे** यांचे मुळ वेतन वेतनाच्या १०० पट प्रमाणे परतफेडीची क्षमता व पेमेंट ऑफ वेजेस ॲक्ट १९३६ मधील कलम ७(३)(२) नुसार तसेच सामान्य प्रशासन विभागाकडील परिपत्रक क्र.प्रशा/१५/कावि/१८६/२०२१ दि.११/६/२०२१ अन्वये अग्रीम परतफेडीच्या क्षमतेच्या परिगणना तपशिल खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| मुळवेतन | = र.रु. | १०० पट = एकूण |
| **३१,१००/-** | **= र.रु. ३१,१००/-** | **१०० पट = ३१,१०,०००/-** |

**सेवा २० वर्ष शिल्लक असेल तर मुळ वेतनाच्या १०० पट अग्रीम मंजुर करता येते परंतु श्री.पगारे यांची सेवा १६ वर्ष ०१ महिने म्हणजेच १९३ महिने शिल्लक असल्याने व शिल्लक सेवेच्या ६ महिने अगोदर मुददल व व्याज वसुल करने आवश्यक असल्याने मुळ वेतनाच्या १०० पट अग्रीम मंजुर करता येत नाही. मुळ वेतनाच्या १०० पट अग्रीम मंजुर केले तर मासिक हप्ता १६१००/- (पुर्णांकित) इतका येतो. त्यानुसार १६३ हप्ते मुददल + २४ हप्ते व्याज = १८७ हप्ते शिल्लक सेवेच्या अनुषंगाने श्री.पगारे यांना (१६३ x १६१००) २६,२४,३००/- इतके येते.**

| | | |
|---|---|---|
| मुळवेतन | = र.रु. | १००% = एकूण |
| **३१,१००/-** | **= र.रु. ३१,१००/-** | **१००% = ३१,१००x १६३ = ५०,६९,३००/-** |

**एकूण पगार / २ — एकूण वजाती** x **एकूण हप्ते = एकूण रक्कम**

**५६,५०३/ २** = २८,२५१/- - ८०२६/- =(घरभाडे भत्ता वसुली वगळता) २०,२२५ x **१६३** = **३२,९६,६७५/-**

| अ.क्र. | तपशिल | अग्रीम क्षमतेचा तपशिल | र.रु. |
|---|---|---|---|
| 1 | मुळ वेतन x १०० टक्के | **३१,१००** x १०० | **३१,१०,०००/-** |
| २ | मुळ वेतन x हप्ते संख्या | **३१,१००** x १६३ | **५०,६९,३००/-** |
| ३ | एकुण पगार / २- एकुण वजाती x हप्ते संख्या | **५६,५०३/२** = २८,**२५१** - ८०२६/- = २०,**२२५**x **१६३** = | **३२,९६,६७५** /- |
| ४ | मासिक हप्ता x शिल्लक सेवा | **१६१००** x **१६३** = | **२६,२४,३००/-** |

वरीलपैकी रक्कम व फ्लॅट क्र. ४१२ चे नगररचना विभागाकडील व्हॅल्युएशननुसार किंमत र.रु.२६,३९,७००/- व एक्सीस बॅंकेकडील शिल्लक असलेली मुद्दल दिनांक २०/०६/२०२४ अखेर र.रु. २३,८१,५४५/-व परत फेडीची क्षमता यापैकी जी रक्कम कमी असेल ती अदा करणे आवश्यक आहे.

श्री.रजनीकांत हरिश्चंद्र पगारे खरेदी करीत असलेला फ्लॅटचे बांधकाम १००% पूर्ण झाले असून, नगररचना व विकास विभागाकडील मुल्यांकनानुसार येणारी रक्कम रुपये २६,३९,७००/- इतकी असलेबाबत उपसंचालक,नगररचना यांनी क्रमांक नरवी/कावि/३४/२४/२०२३, दिनांक.- ११/०६/२०२४ अन्वये अहवाल दिला आहे. तसेच पिंपरी चिंचवड मनपा भोगवटा पत्र क्र. २०२/२०२३ दि.२९/३/२०२३ सादर केले आहे.

श्री.रजनीकांत हरिश्चंद्र पगारे यांची महापालिका आस्थापनेवरील एकूण ११ वर्षे ६ महिने सेवा पूर्ण झाली असून, शिल्लक सेवा १६ वर्षे १ सेवा कालावधी शिल्लक आहे व ते खरेदी करीत असलेल्या फ्लॅटची नगररचना विभागाने कळविले नुसार सध्याच्या बाजारभावानुसार किंमत र.रु. २९,५१,९४९/- इतकी आहे तसेच सदर एक्सीस या बॅंकेकडून घरबांधणी अग्रीम कर्ज र.रु २६,८१,८९३/- घेतलेले असुन दिनांक २०/०६/२०२४ अखेर र.रु २३,८१,५४५ /- कर्ज बाकी आहे. महानगरपालिकेने ठरविलेल्या धोरणानुसार,परतफेडीचे क्षमतेनुसार , पेमेंट ऑफ वेजेस ॲक्टनुसार व शिल्लक सेवेनुसार व बॅंकेकडील असलेल्या अंतीम शिल्लक रकमेनुसार त्यांना र.रु. २३,८१,५४५ /- इतके घरबांधणी अग्रिम मंजूर करता येईल.

श्री.रजनीकांत हरिश्चंद्र पगारे यांना र.रु. २३,८१,५४५ /- घरबांधणी अग्रिम मंजूर केल्यास त्यांच्याकडून घरबांधणी अग्रिमाची वसुली दरमहा र.रु. १४,६००/-प्रमाणे १ ते १६२ हप्ते व शेवटचा १६३ वा

हप्ता र.रु.१६,३४५/- याप्रमाणे करण्यात येईल व तद्नंतर संपूर्ण घरबांधणी अग्रिम रकमेवरील व्याजाची वसुली २४ हप्त्यात करावी लागेल.

**श्री.रजनीकांत हरिश्चंद्र पगारे ,लिपिक व मे.एस.आर.शाह अतुल एंटरप्रायजेस** यांच्यामधील दि. **२५/०१/२०२४** चे खरेदीखत, तसेच श्री.पगारे यांनी सह दुय्यम निबंधक वर्ग २, हवेली क्र.५, पिंपरी चिंचवड यांचेकडील **दस्त क्रमांक १८४४/२०२४ दि.२५/१/२०२४ अन्वये सादर केलेले चुक दुरस्ती** पत्र तसेच **एक्सीस बँके** याचेकडील दि-२०/०६/२०२४ चे स्टेटमेन्ट,तसेच अनुषंगिक कागदपत्रे, संबंधित विभागप्रमुख यांची शिफारस,भोगवटा पत्र व सहाय्यक संचालक,नगररचना व विकास विभाग यांचा अहवाल या बाबी विचारात घेता, **श्री.रजनीकांत हरिश्चंद्र पगारे ,लिपिक** यांना र.रु. **२३,८१,५४५** /- (अक्षरी र.रु. **तेवीस लाख ऐक्याऐंशी हजार पाचशे पंचेचाळीस** फक्त) घरबांधणी अग्रिम मंजूर करुन, घरबांधणी अग्रिमाचा **पहिला/एकरकमी** पुर्णांकित हप्ता र.रु. **२३,८१,५४५** /- (अक्षरी र.रु. **तेवीस लाख ऐक्याऐंशी हजार पाचशे पंचेचाळीस** फक्त) अदा करणेस या आदेशान्वये मान्यता देण्यात येत आहे.

अटी व शर्ती :

१. घरबांधणी अग्रिम रक्कम घेणेपूर्वी फॉर्म नं. ए-२ मध्ये करारनामा व विहित नमुन्यातील कुलमुखत्यारपत्र करुन द्यावे. तसेच **नोंदणीकृतइक्विटेबल मॉर्गेज** ( नोटीस ऑफ इंटीमेशन रिगार्डींग मॉर्गेज बाय डिपॉझिट ऑफ टायटल डीड) सदरची रक्कम घेणेपुर्वी करुन द्यावे. घरबांधणी अग्रिम रकमेची भरणा पावती त्वरीत सादर करावी. **माहे जुलै-२०२४ चे वेतनप्रमाणपत्र सादर करावे.**

२. संबधित मिळकतीचा ताबा मिळालेनंतर अथवा मिळकतीचा भोगवटा सुरु केलेनंतर मिळकतीच्या रकमे इतकी व कर्जाचे मुदतीपर्यंतच्या कालावधीचा विमा उतरविणेत येऊन त्याची प्रत घर बांधणी अग्रीम रकमेचा अंतिम हप्ता मिळणेचे प्रकरणासोबत सादर करणे आवश्यक राहिल याची नोंद घ्यावी.

३. **श्री.रजनीकांत हरिश्चंद्र पगारे** यांना र.रु. **२३,८१,५४५** /- घरबांधणी अग्रिम मंजूर केल्यास त्यांच्याकडून घरबांधणी अग्रिमाची वसुली दरमहा र. १४,६००/-प्रमाणे १ ते १६२ हप्ते व शेवटचा १६३ वा हप्ता र.रु.१६,३४५/- याप्रमाणे करण्यात येईल व तद्नंतर संपूर्ण घरबांधणी अग्रिम रकमेवरील व्याजाची वसुली २४ हप्त्यात केली जाईल.

४. घरबांधणी अग्रिममंजुरीच्या आदेशाची त्याचप्रमाणे अग्रिमाची वसुली पुर्ण झाल्यानंतर या दोन्ही बाबीची नोंद सक्षम प्राधिका-याच्या प्रमाणपत्राच्या आधारे सेवापुस्तकात घेण्यातयावी.

५. घरबांधणी अग्रिमरकमेच्या नियमित व योग्य वसूलीसाठी अर्जदार स्वत: जबाबदार राहील.

६. अग्रिमधारक अनधिकृत रजेवर राहिल्यास अथवा इतर अन्य कोणत्याही कारणास्तव त्याच्या कर्तव्यापासून दूर राहिला,अन्य विभाग/कार्यालयात बदली झाली तरीही घरबांधणी अग्रिम तसेच मनपाकडील इतर अन्य अग्रिमाची नियमित परतफेड करण्यास संबंधित अग्रिमधारक स्वत जबाबदार राहील.

७. **महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक** घबांअ-२०१९/प्र.क्र.१४/२०१९/विनियम **मंत्रालय**, मुंबई-४०००३२, दि. ०२ फेब्रुवारी २०२१ नुसार अग्रिमाची रक्कम रु.**२५** लाखापेक्षा कमी **असल्याने व्याजाची परिगणना एकरुप दराने ७.९ टक्के याप्रमाणे करण्यात यावी.** मात्र शासन तसेच महानगरपालिका धोरणानुसार वेळोवेळी होणारे बदल बंधनकारक राहतील.

८. घरबांधणी अग्रिम ज्या प्रयोजनाकरीता मंजूर केले आहे.त्याकारणाकरीता त्याचा विनियोग न केल्यास किंवा अग्रिम व व्याज परतफेडी च्यासंदर्भातील अटी व शर्तीचे पालन न केल्यास किंवा त्यास कोणत्याही प्रकारची कसूर झाल्यास कसूरदाराकडून अग्रिमाची रक्कम,प्रचलित व्याजदर + २.७५ टक्के दंडनीय व्याजासह एकरकमी वसूल करण्यात येईल.

९. घरबांधणी अग्रिम रकमेची वसूली उक्त अट क्र.२ मध्ये नमूद करण्यात आल्याप्रमाणे अग्रिमाची रक्कम (पहिला/एकरकमी हप्ता) अदा केलेनंतर **जुलै-२०२४** दरमहा नियमित करण्यात येईल.

१०. खरेदी केलेल्या घराचा स्वतः राहणेसाठी वापर करावा, भाडयाने अथवा इतरांना वापरणेस देण्यात येऊ नये. अन्यथा आपणाकडून दंडात्मक व्याजासह संपूर्ण रकमेची वसुली करणेत येईल व फलॅट महानगरपालिकेच्या ताब्यात घेण्यात येईल.

११. सदर रकमेचा धनादेश मे. **एक्सीस बँक** Loan Account No.PHR००**3706865425** यांचे नावे काढणेत यावा.

१२. **एक्सीस बँके कडील जमा केलेले सर्व मुळ दस्ताऐवज( खरेदीखतासह ),गहाणखत रद्द केलेची प्रत व बॅकेचा ना हरकत दाखला** धनादेश मिळालेपासून १५ दिवसाचे आत सादर करावे लागेल. अन्यथा २.७५ टक्के दंडनीय व्याजासह एकरकमी वसूल करण्यात येईल.

१३. **३ महिन्याचे आत खरेदी व्यवहार पूर्ण करुन खालील कागदपत्रांची पूर्तता करावी.मुदतीत कागदपत्रांची पुर्तता न केल्यास सदर अग्रिम रकमेवर दंडात्मक दराने व्याज आकारणी केली जाईल. याची नोंद घ्यावी.**

अ)पहिला/एकरकमी हप्ता बॅकेकडे जमा केलेची पावती
ब) सदर फ्लॅटचा विमा उतरविणेत येऊन विमापत्र सादर करावे
क) मनपा कर्जबोजा नोंद असलेला महानगरपालिका असेंसमेंट उतारा

सही/-
( **किरणकुमार मोरे** )
सहाय्यक आयुक्त
सामान्य प्रशासन विभाग
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

प्रति,
श्री.रजनीकांत हरिश्चंद्र पगारे, पदनाम. लिपिक,वैदयकिय विभाग
प्रत
१.एक्सीस बँक
२.लेखा विभाग
३.संबंधित शाखाधिकारी — **वैदयकिय विभाग**

२/- प्रस्तुत आदेशाची सविस्तर नोंद संबंधिताचे सेवानोंद पुस्तकात घेऊन देयक लेखा शाखेस सादर करणेसाठी अग्रेषीत.

४. **मोशी** करसंकलन कार्यालय

२/- प्रस्तु फ्लॅटची करआकारणी **श्री.रजनीकांत हरिश्चंद्र पगारे** ,लिपिक यांचे नावे होताच महानगरपालिका करआकारणी रजिस्टरला घर अग्रिम र.रु. २३,८१,५४५ /- च्या कर्जबोजाची नोंद घेणेत यावी व तसा पूर्तता अहवाल प्रशासनास तातडीने सादर करणेत यावा.

५.सामान्य प्रशासन विभाग .संगणक कक्ष

(गोरखनाथ लिमण)
प्रशासन अधिकारी,
सामान्य प्रशासन विभाग
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,